# प्रेस नोट

ला.प्र.वि.,वाशिम.
दि. २३/०६/२०२१

ईलोसे) **संजय वसंत डेहणीकर,वय ५२ वर्ष, व्यवसाय प्रमाणीत लेखा परीक्षक,सहकारी संस्था वाशिम जि. वाशिम** रा. श्री गुरु मंदीर जवळ,सरस्वती भवन शेजारी कारंजा लाड जि.वाशिम. यांना ३,६०,०००/- रुपयेची लाच मागणी प्रकरणात गुन्हा नोंद बाबत.

| | |
|---|---|
| आरोपी नांव हुद्दा, व पत्ता | ईलोसे **संजय वसंत डेहणीकर,वय ५२ वर्ष, व्यवसाय प्रमाणीत लेखा परीक्षक,सहकारी संस्था वाशिम जि. वाशिम** रा. श्री गुरु मंदीर जवळ,सरस्वती भवन शेजारी कारंजा लाड जि.वाशिम. |
| लाच मागणी रक्कम | तक्रार -३,६०,०००/- रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांचे संस्थेच्या आर्थिक व्यवहाराचे ऑडीट मधील रिकव्हरीची रक्कम कमी करण्यासाठी ईलोसे यांनी तक्रारदारास लाचेची मागणी केली. |
| सापळा अधिकारी | एस.व्ही. शेळके, पोलीस उपअधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम. |

तक्रारदार यांचे संस्थेच्या आर्थिक व्यवहाराचे ऑडीट मधील रिकव्हरीची रक्कम कमी करण्यासाठी तक्रारदार यांना रु.३,६०,०००/- लाचेची मागणी केल्याची दि. ०८/०४/२०२१ रोजी तक्रार प्राप्त झाली.

दि. ०८/०४/२०२१ व दि.१२/०४/२०२१ रोजी पडताळणी कार्यवाही दरम्यान ईलोसे यांनी तक्रारदार यांना ३,६०,०००/- रुपये लाचेची मागणी करुन लाच स्विकारण्याचे मान्य केले.

दि. २२/०६/२०२१ रोजी तक्रारदार यांनी समक्ष जबाब नोंदविला की," संजय डेहणीकर यांचेशी मोबाईलद्वारे अनेकवेळा संपर्क करण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांनी माझा फोन उचलला नाही.एकंदरीत ते अचानक घरी आलेवर पैसे मागतात आणी मी त्यांना भेटण्याचा व फोन करण्याचा प्रयत्न केला तर टाळाटाळ करतात हे लक्षात आले. त्यामुळे संजय डेहणीकर प्रमाणीत लेखा परीक्षक,यांना माझे दि.२१/०६/२०२१ रोजी मी पैसे न दिल्याने माझे वर्तणुकीवर संशय आल्याने मला भेटण्याचे टाळत आहेत यापुळढेही ते मला भेटुन माझे कडुन लाच रक्कम स्विकारतील असे मला वाटत नाही." यावरुन तक्रारदार यांचे कडुन आरोपी आता लाच रक्कम स्विकारणार नाहीत याबाबत खात्री झाल्याचा जबाब नोंदविल्याने लाच मागणी संबंधाने गुन्हा पोलीस स्टेशन कारंजा शहर जि.वाशिम येथे नोंदविण्याची कार्यवाही चालु आहे.

सदर कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक श्री. विशाल वि. गायकवाड, मा. अपर पोलीस अधिक्षक अरुन सावंत, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती यांचे मार्गदर्शनात पोलीस उपअधिक्षक एस.व्ही. शेळके, व अंमलदार सपोउपनि.नंदकिशोर परळकर, पोना. विनोद अवगळे, योगेश खोटे, राहुल व्यवहारे,ला.प्र.वि.वाशिम यांनी केली आहे.

शासकीय लोकसेवकाने किंवा खाजगी इसमाने शासकीय काम करुन देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास त्याबाबत खालील क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन एस.व्ही. शेळके, पोलीस उपअधिक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम यांनी केले आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम दुरध्वनी क्रमांक- ०७२५२/२३५९३३
टोल फ्रि.नं. - १०६४
एस.व्ही. शेळके - ९९२१०३८१११

( एस.व्ही. शेळके )
पोलीस उपअधिक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,वाशिम.

पोलीस उपअधिक्षक अँन्टी करप्शन ब्युरो वाशिम

Scanned by TapScanner